LIBRARY

PCC3AEW Mar-II Sem-IV

SUDA- 18/3/17

वेळ : २ तास ३० मि. गुण : ७५

प्र. १. मराठीतील आत्मचरित्र या साहित्य प्रकाराच्या परंपरेचा सोदाहरण आढावा घ्या.

किंवा

आत्मचरित्र म्हणजे काय ते सांगून आत्मचरित्र लेखनामागील हेतू, प्रेरणा व प्रयोजने यांची चर्चा करा. (१५)

प्र. २. शिक्षण घेताना यशवंत केवळे यांना आलेल ब-या वाईट अनुभवांची 'जगायचंय प्रत्येक सेकंद!' या आत्मकथनाच्या आधारे सोदाहरण चर्चा करा.

किंवा

"'जगायचंय प्रत्येक सेकंद!' या आत्मकथनाची आशयसूत्रे, कथनशैली आणि भाषिक वैशिष्टये या घटकांच्या अनुषंगाने सोदाहरण चिकित्सा करा. (१५)

प्र. ३ 'मी तो हमाल' या आत्मकथनातून भूक, दारिद्रय, अंधश्रध्दा आणि शोषण ही आशयसूत्रे कशी प्रकट होतात, ते स्पष्ट करा.

किंवा

"'मी तो हमाल' या आत्मकथनातून श्री. आप्पा कोरपे सर्व प्रसंगांना अत्यंत धैर्याने सामोरे जातात याचा प्रत्यय येतो," या विधानाची सोदाहरण चिकित्सा करा. (१५)

प्र. ४ **टीपा लिहा.**

अ) आत्मचरित्रलेखनामागील हेतू
किंवा
मराठीतील दलित आत्मकथने (५)

ब) 'जगायचंय प्रत्येक सेकंद!' मधील यशवंता
किंवा
डॉ. यशवंत केवळे यांचा पर्यटनाचा छंद (५)

क) 'मी तो हमाल' मधील मृत्युचे चित्रण
किंवा
'मी तो हमाल' मधील अंधश्रध्दा (५)

PQ3AEW

**प्र. ५ अ) खालीलपैकी कोणत्याही ५ प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** (१०)

१) डॉ. यशवंत केवळे यांचे मूळ गांव कोणते ?

२) यशवंताच्या मेडीकल कॉलेजच्या शिक्षणासाठी कोणी मदत केली?

३) "जगायचंय प्रत्येक सेकंद!" या आत्मकथनात कोणाचे जीवनचरित्र रेखाटले आहे ?

४) लग्नानंतर मंगल आणि यशवंता मधुचंद्रासाठी कुठे गेले ?

५) अहमदनगरला हमाल भवन कोणी उभारले ?

६) आप्पा कोरपे काय काम करायचे?

७) आप्पा कोरपे यांच्या बहिणीचे नाव लिहा ?

८) आप्पा कोरपे यांच्या आईने दुसरे लग्न का केले?

**प्र. ५ ब) योग्य पर्याय निवडा.** (५)

१) दादासाहेब मोरे यांनी लिहिलेल्या आत्मचरित्राचे नाव लिहा.
अ) बेरड   ब) गावकी   क) गबाळ

२) 'मरणकळा' हे आत्मकथन कोणी लिहिले आहे ?
अ) पंडिता रमाबाई   ब) रमाबाई रानडे   क) जनाबाई गि-हे

३) 'उचल्या' हे आत्मकथन कोणी लिहिले आहे?
अ) उत्तम बंडू तुपे   ब) लक्ष्मण माने   क) लक्ष्मण गायकवाड

४) 'क्रीडाजीवन' हे आत्मचरित्र कोणी लिहिले आहे ?
अ) खंडू रांगणेकर   ब) सी. के. नायडू   क) पी. विठ्ठल

५) एक सामाजिक दस्ताऐवज म्हणून कोणत्या लेखनप्रकाराकडे पाहिले जाते?
अ) नाटक   ब) कादंबरी   क) आत्मकथन